# जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अकोला यांचेकडून प्राप्त झालेल्या अकोला जिल्हयातील ३७ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. ०२.०१.२०२३ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे दुपारी ३.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त

---------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी खनिकर्म विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचेकडून अकोला जिल्हयातील ३७ रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०२.०१.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ मुंबई यांनी आदेश क्र. E-101 of 2022 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-221213-FTS-0150 दि. १३.१२.२०२२ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्रीमती निमा अरोरा, जिल्हादंडाधिकारी, अकोला — अध्यक्ष
२. श्री. राजेंद्र आ. राजपूत, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्री मनिष होळकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अकोला — आयोजक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. ०३.१२.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ०२.०१.२०२३ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हाधिकारी मा. श्रीमती निमा अरोरा यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम श्री. सं. दे. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अकोला जिल्हयातील ३७ रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अकोला यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, २रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कलजवळ, (पु.) मुंबई-४०००२२.
२. प्रादेशिक कार्यालय, अमरावती, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी विवेकानंद कॉलनीजवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०६.
३. उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, हुतात्मा चौक, नेहरू पार्क जवळ, अकोला.
४. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, जिल्हा परिषद, अकोला, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला.
५. जिल्हयातील सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये व संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, जि. अकोला.

श्री. सं. दे. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी अमरावती यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी श्री प्रशिल शुक्ला, एन्हायरो टेक्नो कंसल्टंट प्रा.लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री. सं. दे. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी अमरावती यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

श्री अमीत काळकर, अकोला, यांनी सुचना केली की, मागील वर्षी लिलाव झालेल्या घाटांपैकी काही घाटातील पाण्याची पातळी कमी न झाल्यामुळे रेती उपसा करता आला नाही. अशा प्रकारचे घाट यावर्षी लिलावामधे घेण्यात येवू नये.

मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, सदयस्थीतीत ज्या रेतीघाटामधे पाणी वाढण्याची शक्यता नाही अशाच रेतीघाटांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

श्री निलेश भगत, अकोला यांनी निदर्शनास आणून दिले की, निंबा मंडळामधील रेतीघाटांतील रेतीची जास्त प्रमाणात चोरी झालेली आहे. त्यांनी पूढे विचारणा केली की, याबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहे. तसेच ज्या ट्रॅक्टर्स मधून रेतीची वाहतुक केली जाते त्या ट्रॅक्टर्सना जी.पी.एस. यंत्रणा बसविलेली नाही.

मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, रेती चोरी बाबत महसूल विभागाने भरारी पथक नेमलेले असून त्यांचेमार्फत निगराणी ठेवण्यात येते. राज्यसराकारच्या नविन धोरणानुसार याबाबत सुधारणा करण्यात येईल. तसेच त्यांनी सांगीतले की, काही सुचना असल्यास माझेकडे सादर केल्यानंतर त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री काळकर यांनी सांगीतले की, मागील वर्षी ३० सप्टेंबर २०२२ नंतर रेतीघाटातुन रेती चोरीस आळा घालण्याबाबत कोणतेही नियंत्रण नव्हते. त्यांनी पूढे निदर्शनास आणून दिले की, अकोला

शहर सोडून जिल्हयामधे इतर ठिकाणी चोरीच्या रेतीचा वापर होतो. त्यामुळे आम्ही कायदेशीर बाबीचे पालन करूनही आमच्या व्यवसायावर विपरीत परीणाम होतो.

मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, रेती चोरी बाबत अवैध रेती उपसा करणे बंद करण्यात येवून कायदेशीर पदधतीने रेती उपसा करणा-यांकडूनच रेती विक्री करण्यात यावी याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

श्री बाळकृष्ण दिवटे यांनी सांगीतले की, सदयस्थीतीत रेती घाटाची प्रक्रिया चालू व्हायच्या अगोदरच लोहारा ते निंभा गाव येथील रेती घाटांतील रेती चोरी होत आहे. त्यामुळे लिलावामधे रेतीघाटाकरीता भरलेले पैसे वसुल होत नाही.

मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, यानंतर प्रत्येक रेतीघाटांवर तलाठी किंवा कोतवालची नेमणूक करण्यात येवून उपलब्ध असलेला रेतीसाठया बाबत दररोज अहवाल मागविण्यात येईल. मा. अध्यक्षा यांनी रेतीघाटामधे प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या रेतीच्या साठयानुसारच शुल्क आकारण्यात येईल असे आदेश पारित करणेबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना सुचना दिल्या.

श्री हरीराम गावंडे यांनी सांगीतले की, रेती घाटांचे लिलाव लवकरात लवकर सुरू करण्यात यावे. जेणेकरून रेती उपसा करण्याकरीता पुरेसा कालावधी मिळेल. तसेच त्यांनी सांगीतले की, रेती उपसा करण्याकरीता डिसेंबर महिन्यापर्यंत मुभा देण्यात यावी.

मा. अध्यक्षा यांनी सांगीतले की, रेती घाटांचे लिलाव लवकरात लवकर सुरू करण्यात येईल तसेच रेती उपसा डिसेंबर महिन्यापर्यंत चालू ठेवणेबाबत शासनास शिफारस करण्यात येईल.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| होळकर | 02/09/2023 | |
| (मनिष होळकर)<br>आयोजक<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी<br>अकोला | ( रा.आ. राजपूत)<br>सदस्य<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी<br>अमरावती | (निमा अरोरा)<br>अध्यक्ष लोकसुनावणी समिती<br>तथा<br>जिल्हादंडाधिकारी, अकोला |